मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दिनांक ५ डिसेंबर २०२३ । पान १

# स्थानिक नागरिकांसाठी खेळाचे मैदान, उद्यान विकसित करण्याची मागणी!

## माजी महापौर राहुल जाधव यांचे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** जाधववाडी आणि बोऱ्हाडेवाडी परिसरात नागरीकरण वाढले असून, स्थानिक नागरिकांसाठी पायाभूत सोयी-सुविधा सक्षम कराव्यात. तसेच, ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान आणि मुलांसाठी खेळाचे मैदान विकसित करावे, अशी मागणी माजी महापौर राहुल जाधव यांनी केली आहे. याबद्दल मोशी, बोऱ्हाडेवाडी आणि जाधववाडी परिसरातील स्थानिक लोकप्रतिनिंच्या उपस्थिती मध्ये महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेविका सारिका बोऱ्हाडे, अश्विनी जाधव, सामाजिक कार्यकर्ते नितीन बोऱ्हाडे, निलेश बोराटे, संतोष जाधव, निखिल बोऱ्हाडे, सोनम जांभुळकर आदी उपस्थित होते. आयुक्तांना दिलेल्या निवदनामध्ये म्हटले आहे की, जाधववाडी-बोऱ्हाडेवाडी येथे ‘एसटीपी’ची जागा ही खेळाच्या मैदानासाठी योग्य आहे. तसेच, परिसरात गार्डनसाठी एकही आरक्षण नाही. त्यामुळे खेळाचे मैदान व गार्डन हे १/ १३० या आरक्षणामध्ये गट नंबर ९० मध्ये विकसित करण्यात यावे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील समाविष्ट गाव जाधववाडी आणि बोऱ्हाडेवाडी या भागातील सोसायटीधारक आणि रहिवाशांची संख्या मोठी आहे. स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार, या भागात उद्यान व खेळाचे मैदान विकसित करण्याची आवश्यकता आहे, अशी भावना स्थानिक लोकप्रतिनिधींची आहे.




### प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी

**» सदर गावांचा समावेश महापालिका हद्दीत होवून आता २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे विकास आराखड्याप्रमाणे पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करणे प्रशासनाची जबाबदारी असून, नागरिक लोकप्रतिनिधींकडे तगादा लावत आहेत. या बाबींचा विचार करुन जाधववाडी आणि बोऱ्हाडेवाडी या भागातील मोकळ्या जागेत उद्यान आणि खेळाचे मैदान विकसित करावे. त्यामुळे नागरिक आणि मुलांना सुविधा होईल. यासाठी प्रशासनाने सकारात्मक पुढाकार घ्यावा, अशी अशी मागणीही माजी महापौर राहुल जाधव यांनी केली आहे.**

# महापालिका शाळांमध्ये ३२ क्रीडा शिक्षकांची नियुक्ती

## क्रीडा संस्कृतीची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल

**मोशी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा संस्कृतीची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण पाऊल उचलत, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने ३२ प्राथमिक शाळांमध्ये ३२ क्रीडा शिक्षकांची नियुक्ती केली आहे. निवड करण्यात आलेल्या शाळांमध्ये २४ सर्वात जास्त पटसंख्या असलेल्या शाळांचा आणि ८ जल्लोष शिक्षणाचा उपक्रमात अव्वल आलेल्या शाळांचा समावेश आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली. विद्यार्थ्यांना विविध खेळांमध्ये निपुण करणे, त्यांच्यातील प्रतिभा ओळखणे आणि लहानपणापासूनच शारीरिक विकासाबद्दल जिज्ञासा निर्माण करण्याचा उद्देश यामागे आहे, असेही ते म्हणाले. या उपक्रमाबाबत माहिती सांगताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, नियुक्त करण्यात आलेल्या क्रीडा शिक्षकांना सांघिक तांत्रिक कौशल्ये, शालेय शिस्त तसेच शारीरिक विकास या मूल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. क्रीडाविषयक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दलची आवड तसेच



क्रीडा शिक्षणासाठी सर्वांगीण दृष्टीकोन निर्माण होईल. या उपक्रमाद्वारे महापालिका शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबत शारीरिक विकासालाही हातभार लागणार आहे. क्रीडा शिक्षणातील ही गुंतवणूक महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वपुर्ण ठरणार असून विद्यार्थ्यांच्या शारीरीक आरोग्यासाठी वेगळा मार्ग महापालिकेने निर्माण केला आहे. त्यातून एक चांगली पिढी घडली जाईल असा विश्वास आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी व्यक्त केला. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले, या महत्वाकांक्षी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक प्रगतीबरोबरच त्यांच्यातील विविध क्रीडा विषयांमधील क्षमता शोधण्यासाठी एक व्यासपीठ निर्माण होणार आहे. भविष्याच्या दृष्टीने महापालिका शाळेतील अनेक विद्यार्थ्यांना खेळामध्ये कारकीर्द घडविण्याची आणि सर्वांगीण विकासाला हातभार लावण्याची संधी मिळणार आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने काम करत असताना शिक्षक शैक्षणिक जबाबदाऱ्यांमध्ये मग्न असतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा शिक्षणाची आवड तर निर्माण होईलच सोबतच शिक्षकांवरील कामाचा भारही कमी होणार आहे. विशेष क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करून महापालिका अधिक व्यापक आणि संतुलित शिक्षण प्रणालीसाठी मार्ग मोकळा करत असून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा विषयाबाबतची प्रतिभाही निर्माण करत आहे, असेही जांभळे पाटील म्हणाले.

# पुणे-लोणावळा दरम्यान दुपारच्या लोकल सुरु करा

## खासदार श्रीरंग बारणे यांची संसदेत मागणी




**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडे अकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत एकही लोकल गाडी नसल्याने प्रवासी, विद्यार्थी, चाकरमानी, नोकरदार, पर्यटक यांचे हाल होत आहेत. नागरिकांमध्ये याबाबत आंदोलनाची भावना वाढत आहे. त्यामुळे रेल्वे मंत्रालयाकडून पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडे अकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत लोकल गाडी सुरु करण्याची मागणी मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी थेट संसदेत केली आहे. खासदार श्रीरंग बारणे यांनी म्हटले आहे की, कोरोना साथ सुरु होण्यापूर्वी पुणे-लोणावळा दरम्यान लोकल गाड्यांचे संचालन व्यवस्थित सुरु होते. कोरोना साथीच्या कालावधीत रेल्वेची सेवाच बंद करण्यात आली. कोरोनानंतर आता देशात पूर्वीप्रमाणे सर्व रेल्वे सुरु झाल्या आहेत. कोरोना साथीच्या अगोदर पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडे अकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत दोन लोकल गाड्या चालवल्या जात होत्या. त्या गाड्यांचे संचालन आता बंद आहे. या कालावधीत देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी तीन तास ब्लॉक घेतला जात असल्याचे कारण रेल्वे विभागाकडून दिले जात आहे. मात्र याच कालावधीत मालगाड्यांचे संचालन पूर्ण क्षमतेने होत आहे. मालगाड्या चालवून रेल्वे विभाग आर्थिक लाभ घेत आहे. परंतु प्रवासी गाड्या बंद करून देखभालीचे कारण दिले जात आहे. याबाबत रेल्वे मंत्रालयाला खासदार श्रीरंग बारणे यांनी यापूर्वी अनेकदा पत्रव्यवहार केला आहे. तरी देखील रेल्वे विभागाने याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही. पुणे-लोणावळा मार्गावर विद्यार्थी, महिला, शेतकरी, नोकरदार, पर्यटक अशा अनेक घटकातील हजारो प्रवासी प्रवास करतात. तळेगाव आणि पिंपरी-चिंचवड मधील औद्योगिक वसाहतींमध्ये दुसऱ्या शिफ्टच्या कर्मचाऱ्यांना कामावर येण्यासाठी साडेअकरा ते अडीच वाजताच्या कालावधीत येणाऱ्या लोकलचा मोठा फायदा होऊ शकतो. तीन तास लोकल नसल्याने रेल्वे स्थानकांवर विद्यार्थी इतरत्र भटकत राहतात. यामुळे गंभीर घटना घडण्याची शक्यता आहे. पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडेअकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत लोकल नसल्याने नागरिकांमध्ये रेल्वे प्रशासनाबाबत चीड निर्माण होत आहे. नागरिकांकडून आंदोलनाचा इशारा दिला जात आहे. नागरिकांची मागणी लक्षात घेत लोकल सुरु न केल्यास आपणही या जनआंदोलनात सहभाग घेणार असल्याचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले. तसेच वरील कालावधीत लोकल गाड्या सुरु करण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली.

### गाड्यांचे संचालन आता आहे बंद

» कोरोना साथ सुरु होण्यापूर्वी पुणे-लोणावळा दरम्यान लोकल गाड्यांचे संचालन व्यवस्थित सुरु होते. कोरोना साथीच्या कालावधीत रेल्वेची सेवाच बंद करण्यात आली. कोरोनानंतर आता देशात पूर्वीप्रमाणे सर्व रेल्वे सुरु झाल्या आहेत. कोरोना साथीच्या अगोदर पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी साडे अकरा ते दुपारी अडीच वाजताच्या कालावधीत दोन लोकल गाड्या चालवल्या जात होत्या. त्या गाड्यांचे संचालन आता बंद आहे. या कालावधीत देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी तीन तास ब्लॉक घेतला जात असल्याचे कारण रेल्वे विभागाकडून दिले जात आहे.

# काँग्रेसची कार्यकारिणी जाहीर; 'यांची' लागली वर्णी

## तीन ब्लॉक अध्यक्ष, दोन वरिष्ठ उपाध्यक्ष, सतरा उपाध्यक्ष तर सव्वीस सरचिटणीस

**पिंपरी-चिंचवड ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** चिंचवड शहर (जिल्हा) काँग्रेस पक्षाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. प्रांताध्यक्ष आमदार नाना पटोले यांनी मान्यता दिली. त्यानुसार शहराध्यक्ष कैलास कदम यांनी आज (सोमवार) कार्यकारिणी जाहीर केलेली आहे. यात तीन ब्लॉक अध्यक्ष, दोन वरिष्ठ उपाध्यक्ष, सतरा उपाध्यक्ष तर सव्वीस सरचिटणीस आहेत. चिंचवड ब्लॉक अध्यक्ष – ज्ञानेश्वर मलशेट्टी, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष – विश्वनाथ जगताप, भोसरी ब्लॉक अध्यक्ष – विठ्ठल शिंदे वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र रामदास बनसोडे, भरत शंकर वाल्हेकर, उपाध्यक्ष ॲड. के. एम. रॉय, सज्जी वर्की, अख्तार चौधरी, अशोक लांडे, शाम भोसले, संभाजी मुळीक, अबूबकर लांडगे, राजू बंदपट्टे, हाजी अब्बास शेख, अर्चना राऊत, वाल्मिक माने, केनिथ रेमी, उमेश बनसोडे, मेहबूब शेख, जितेंद्र छाबडा, सोमनाथ शेळके, आलम बशीर शेख तर सरचिटणीस तारिक रिझवी, सचिन कोंढरे, शाकीब खान, शशी नायर, इस्माईल संगम, बाबा बनसोडे, निखिल भोईर, अनिता अधिकारी. छायावती देसले, नंदा तुळसे, वकील प्रसाद गुप्ता, सतीश भोसले, नजिया साजिद अली बारस्कर,



विरेन्द्र गायकवाड, नारायण धोत्रे, बसवराज शेट्टी, आण्णा कसबे, हरिष डोळस, जॉर्ज मॅथ्यू, गणेश तुळशीराम गरड, सचिन गायकवाड, रवि कांबळे, प्रियंका सलिल कदम, अल्लावली अब्दुलसाहब बेटेगिरी (खान), जुबेर खान, राजू ठोकले, चिटणीस गौतम ओव्हाळ, महादेव चव्हाण, वामन एनिले, मिलिंद फडतरे, महादेव वाळूंजकर, इरफान शेख, लखन राजवाडिया, डॉ. अक्षय माने, दीपक भंडारी, संपत बांगर, बबलू जोसेफ, जनार्दन पोळकडे, सुधाकर कुंभार, ॲड. मोहन तुकाराम अडसूळ, देवदत्त मारूतराव पोखरकर, संदीप शिंदे, गुंगा (उपसऑर्शी ) क्षीरसागर, भास्कर नारखडे, पांडुरंग जगताप, युनूस बागवान, योगेश बहिरट, आकाश विठ्ठल शिंदे, कोषाध्यक्ष शाम आगरवाल तर मार्गदर्शक कविचंद भाट, अशोक मोरे, निगार बारस्कर, शामला सोनावणे, गौतम आरकडे, संग्राम तावडे, कैलास भांबूर्डेकर, भाऊसाहेब मुगुटमल, तानाजी काटे, अभिमन्यु दहितुले, अर्जुन लांडगे, राजाराम भोंडवे, मनोज कांबळे, विश्वास गजरमल, रवी खन्ना, ॲड सोपानराव माने, डॉ. जितेंद्र जैन, अशोक मंगल, देवानंद गुप्ता. एन. एस. यू. आय. – डॉ. वसिम इनामदार, महिला आघाडी सायली नढे आणि युवक आघाडीच्या प्रमुखपदी कौस्तुभ नवले, अनुसुचित जाती विभाग विजय ओव्हाळ, पर्यावरण विभाग अक्षय शहरकर, रोजगार व स्वयंरोजगार विभाग विशाल सरवदे. विज्ञान तंत्रज्ञान व कौशल्य विकास विभाग रवि नांगरे, डॉक्टर सेल डॉ. मनीषा गरुड, सहकार सेल के हरिणारायणन, सांस्कृतिक सेल गणेश नांगरे, परिवाहन विभाग सुरज गायकवाड, औद्योगिक सेल प्रतिभा कांबळे, प्रोफेशनल काँग्रेस दाहर मुजावर, ग्राहक संरक्षण सेल झेव्हिअर अँथनी, वक्ता सेल विजय इंगळे, झोपडपट्टी सेल प्रा. बी. बी. शिंदे, ज्येष्ठ नागरिक सेल लक्ष्मण रुपनार,व्यापारी सेल अमरजीत सिंह पाथीवाल आणि पथारी हातगाडी भाजी विक्रेते सेल च्या प्रमुखपदी गौरी शेलार यांची निवड करण्यात आली

# रिंगरोडच्या भूसंपादनात नवा ट्विस्ट!

## रिंगरोड भूसंपादनात पाच गावे प्रकल्पातून वगळली

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) हाती घेण्यात आलेल्या रिंगरोडसाठी भूसंपादन सुरू आहे. आतापर्यंत २०५ हेक्टरपेक्षा जास्त जमीन प्रत्यक्ष ताब्यात आली आहे. त्यासाठी १०२१ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचे वाटप मोबदला म्हणून देण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने एकीकडे भूसंपादनाचा धडाका लावलेला असतानाच या प्रकल्पात एक नवा ट्विस्ट आला आहे. प्रखर विरोधामुळे भोर तालुक्यातील पाच गावे वगळण्यात आली आहेत. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते महामंडळाने १७२ किलोमीटर लांबी आणि ११० मीटर रुंदीचा रिंगरोड प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे काम पूर्व आणि पश्चिम असे दोन भागात करण्यात आले आहेत. प्रकल्पासाठी ७२१ हेक्टर जमिनीचे संपादन करावे लागणार आहे. या प्रकल्पासाठी भोर तालुक्यातील रांजे, कुसगाव, खोपी, कांजळे, केळवडे, कांबरे आणि नायगाव ही गावे बाधीत होणार होती. या गावांतील संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनींच्या सातबारा उताऱ्यावरील 'रिंगरोडसाठी राखीव' अशी नोंद रद्द करण्याची नोटीस कढण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर महामार्गाला वर्तुळाकार रस्ता जोडताना शिवरे गावातील बागायती जमिनींमधून केलेल्या आखणीलाही स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. हे क्षेत्र वाचवण्यासाठी बोगदा करण्याची आणि पुणे-बेंगळुरूच्या नव्या आखणीत भोर तालुक्यातील खोपी ते राजापूर पांडे या पट्ट्यातील २२ गावे बाधीत होत आहेत. त्यामुळे ती गावेही वगळण्याची मागणी होत आहे.



> **“भोर तालुक्यातील खोपी, केळवडे, कांजळे, कांबरे आणि नायगाव या गावांतील क्षेत्र वर्तुळाकार रस्त्याच्या पश्चिम भागातून वगळण्याचा निर्णय झाला आहे. या पाच गावांतील सातबारा उताऱ्यावरील वर्तुळाकार रस्त्याच्या इतर हक्कातील नोंदी रद्द करण्याचे आदेश संबंधित तलाठी, मंडल अधिकाऱ्यांना दिले आहेत.**
> **— राजेंद्र कचरे, प्रांत, भोर**

### एक लाख रुपयांचा दंड

**» शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते महामंडळाने १७२ किलोमीटर लांबी आणि ११० मीटर रुंदीचा रिंगरोड प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाचे काम पूर्व आणि पश्चिम असे दोन भागात करण्यात आले आहेत. प्रकल्पासाठी ७२१ हेक्टर जमिनीचे संपादन करावे लागणार आहे. या प्रकल्पासाठी भोर तालुक्यातील रांजे, कुसगाव, खोपी, कांजळे, केळवडे, कांबरे आणि नायगाव ही गावे बाधीत होणार होती. या गावांतील संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनींच्या सातबारा उताऱ्यावरील 'रिंगरोडसाठी राखीव' अशी नोंद रद्द करण्याची नोटीस कढण्यात आली आहे.**

# राष्ट्रीय स्मारकासाठी भिडेवाडा इतिहासजमा!

## पोलीस बंदोबस्तात रात्री महापालिकेकडून कार्यवाही

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात देशातली मुलींची पहिली शाळा सुरू केलेला भिडेवाडा रात्री पोलीस बंदोबस्तात पाडण्यात आला. आता त्या ठिकाणी राष्ट्रीय स्मारक होणार आहे. भिडेवाडा हा शहराच्या मध्यवस्तीत आहे. त्यामुळे वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता असल्याने महापालिकेने रात्री अकरानंतर वाडा पाडण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार रात्री पोलीस बंदोबस्तात वाडा पाडल्याने अखेर भिडेवाडा इतिहासजमा झाला आहे. भिडे वाड्यासंदर्भातला सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेला खटला पुणे महापालिका आणि राज्य सरकारने जिंकला होता. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी बुधवार पेठ परिसरातील भिडे वाड्यात मुलींसाठी देशातली पहिली शाळा सुरू केली. या वाड्याचे राष्ट्रीय स्मारक व्हावे, अशी मागणी 'मुलींची पहिली शाळा सार्वजनिक स्मारक समिती'च्या वतीने पुढे आली होती. त्याला पुणे महापालिका आणि राज्य सरकारनेही अनुकूलता दर्शवली. मात्र, १३ वर्षे हे प्रकरण न्यायालयात अडकले होते. या वाड्यासंदर्भातील स्थानिक रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळली होती. या स्मारकासाठी तेरा वर्षे संघर्ष करावा लागला. याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त करत याचिकाकर्त्यांना दंड का करू नये, अशी विचारणा करतानाच एक महिन्यामध्ये जागा रिकामी करून ती महापालिकेला हस्तांतरीत करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आता भिडेवाडा हा इतिहासजमा झाला आहे. आता या ठिकाणी स्मारक होणार आहे.



### स्मारकासाठी तेरा वर्षे संघर्ष

**» महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १ जानेवारी १८४८ रोजी बुधवार पेठ परिसरातील भिडे वाड्यात मुलींसाठी देशातली पहिली शाळा सुरू केली. या वाड्याचे राष्ट्रीय स्मारक व्हावे, अशी मागणी 'मुलींची पहिली शाळा सार्वजनिक स्मारक समिती'च्या वतीने पुढे आली होती. त्याला पुणे महापालिका आणि राज्य सरकारनेही अनुकूलता दर्शवली. मात्र, १३ वर्षे हे प्रकरण न्यायालयात अडकले होते. या वाड्यासंदर्भातील स्थानिक रहिवाशांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका न्यायालयाने फेटाळली होती. या स्मारकासाठी तेरा वर्षे संघर्ष करावा लागला.**

# एसटी प्रवाशांसाठी खुशखबर!

## शिवाजीनगर स्थानकाला अखेर मुहूर्त

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे (एसटी) शिवाजीनगर स्थानक वाकडेवाडीला हलवल्यानंतर चार वर्षांनी अखेर ते मूळ जागी उभारण्याचा निर्णय झाला आहे. स्थानकासोबत व्यावसायिक संकुल उभारण्याचा एसटी महामंडळाचा प्रस्ताव महामेट्रोने फेटाळला होता. यानंतर आता एसटीने व्यावसायिक संकुलाऐवजी केवळ स्थानक उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या स्थानकाचा आराखडा या आठवड्यात अंतिम होणार आहे. शिवाजीनगर एसटी स्थानकाची चार एकर जागा होती. त्यातील सुमारे एक एकर जागा महामेट्रोला भुयारी मेट्रो स्थानक उभारण्यासाठी देण्यात आली. याबाबत मेट्रो आणि एसटीमध्ये करार झाला होता. शिवाजीनगर



स्थानक पाडल्यानंतर तात्पुरत्या स्वरुपात ते २०१९ मध्ये वाकडेवाडी येथे दुग्धविकास विभागाच्या जागेत हलवण्यात आले. या जागेचे भाडे मेट्रो दुग्धविकास विभागाला देणार, असा निर्णय झाला होता. तीन वर्षांच्या कालावधीसाठी हे ठरले होते. आता त्याला चार वर्षे उलटली असून, शिवाजीनगर मेट्रो स्थानक सुरू झाले आहे. तरीही एसटी स्थानक अजूनही वाकडेवाडी येथेच आहे. एसटीच्या जागेपोटी शिवाजीनगर एसटी स्थानक महामेट्रो उभारणार आहे. महामेट्रोने तळमजल्याचे बांधकाम करून, त्यावर २१ फलाटांचे स्थानक आणि एसटीची कार्यालये असे बांधकाम करून देण्याची तयारी दर्शविली आहे. एसटीने या जागी व्यावसायिक संकुल बांधण्याचा आग्रह धरला होता. याबाबत एसटीच्या उपसरव्यवस्थापकांनी महामेट्रोला ४ मे रोजी पत्र पाठविले होते. त्यात शिवाजीनगर येथे एसटीच्या जागेवर व्यावसायिक संकुल उभारण्याची व्यावसायिक व्यवहार्यता तपासण्याची मागणी करण्यात आली. त्यावर महामेट्रोने २२ ऑगस्टला एसटीला पत्र पाठवून व्यावसायिक संकुल उभारणे व्यवहार्य नसून, तिथे एसटी स्थानक उभारून देण्याचा पुनरुच्चार केला होता. आता यावर एसटीने केवळ स्थानक उभारण्याचा अंतिम निर्णय घेतला आहे, अशी माहिती एसटीतील

> **“शिवाजीनगर येथील एसटी स्थानकाची ३६ गुंठे जागा महामेट्रोने घेतली. या जागेच्या बाजारमूल्याएवढे एसटी स्थानक मेट्रो बांधून देईल. एसटीकडून नवीन स्थानकाचा आराखडा मिळण्याची प्रतीक्षा आहे. एसटीकडून आराखडा मिळाल्यानंतर लगेचच स्थानकाचे काम सुरू होईल.**
> **– अतुल गाडगीळ, संचालक (कार्य), महामेट्रो**

> **“शिवाजीनगर एसटी स्थानकाचा आराखडा तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. स्थानकाची रचना तळमजला आणि वर स्थानक अशी असेल. या आठवड्यात आराखडा मंजूर करून महामेट्रोकडे पाठविण्यात येईल.**
> **– विद्या भिलारकर, उपसरव्यवस्थापक, एसटी महामंडळ**

सूत्रांनी दिली. शिवाजीनगर स्थानकात आधी एसटीची कार्यशाळा होती. ती एसटी स्थानकासोबत वाकडेवाडीला स्थलांतरित करण्यात आली. आता ही कार्यशाळा सांगवी येथे हलविण्याचा प्रस्ताव आहे. याच वेळी दुग्धविकास विभागाची अडीच एकर जागा कार्यशाळेसाठी मिळावी, अशी मागणी राज्य सरकारकडे करण्यात आली आहे. यावर राज्य सरकारकडून अद्याप निर्णय झालेला नाही.

# उजनी धरणातील मासेमारीबाबत घेतला कठोर निर्णय

## मासेमारी करण्यासाठी परवाना बंधनकारक आहे

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

उजनी जलाशयात लहान मासळी मासेमारी करणारे मत्स्यव्यवसायिक, जलाशयालगत संपादित क्षेत्रात अनधिकृतपणे बंदी घालण्यात आलेल्या मांगूर मत्स्यपालन करणाऱ्यांवर संयुक्त कारवाई करावी. गुन्हे दाखल करावेत. मासेमारी शकरण्यासाठी परवाना बंधनकारक आहे, असे कठोर निर्णय जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी सोमवारी घेतले. उजनी जलाशयात पुणे जिल्ह्यातील दौंड आणि इंदापूर, सोलापूरमधील माढा, करमाळा, तर नगर जिल्ह्यातील कर्जत आणि श्रीगोंदा तालुक्यातील परवानाधारक आणि



विनापरवाना मत्स्य व्यावसायिक अनधिकृतपणे लहान मासळी मासेमारी करत असल्याचे आढळून आले आहे. त्याला प्रतिबंध घालण्याच्या अनुषंगाने डॉ. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली जलसंपदा, पोलीस, महसूल, मत्स्यव्यवसाय विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि स्थानिक मच्छिमार संघटनांचे प्रतिनिधी यांच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी कारवाईचे आदेश दिले. लहान मासळी मासेमारी, मांगूरपालन करु नये, लहान मासळी मासेमारीकरीता वापरण्यात येणारी जाळी व साहित्य त्वरीत नष्ट करावे. प्रतिबंधित मांगूर मत्स्यपालन करणाऱ्यांनी त्यांच्याकडील मांगूर मासा साठा नष्ट करावा. उजनी जलाशय संपादित क्षेत्रात असणारी शेततळी नष्ट करावीत. संपादित क्षेत्रात अशा प्रकारचे कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. मासेमारी करण्यासाठी परवाना बंधनकारक आहे. स्थानिक मत्स्य व्यवसायिकांनी उजनी जलाशयात मासेमारीसाठी आवश्यक परवाना नजीकच्या जलसंपदा विभाग शाखा कार्यालयाशी संपर्क साधून घ्यावा. परवाना नसलेल्या मत्स्य व्यवसायिकांवर विनापरवाना जलाशयात प्रवेश केल्याबद्दल कारवाई करण्यात येईल, असे उजनी धरण व्यवस्थापन विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी सांगितले.